दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उप संपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड- महाराष्ट्र | बीड, रविवार, दि. 16 फेब्रवारी 2025 | अंक क्र. 269 | वर्षे 2 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4




# थेट अन् ग्रेट : भरतभेट !! अवघे अवघे या

## पुरस्कार आणि मान्यता

टॉरल इंडिया आणि भारतच्या नेतृत्वाला मिळालेल्या अनेक मान्यतेपैकी, एसएमई चेंबर ऑफ इंडियाने भरत गित्ते यांना २०१८ मध्ये दिलेला "प्राइड ऑफ महाराष्ट्र" पुरस्कार आणि २०२० मध्ये माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या प्री-बजेट परिषदेत ते निवडक ३० भारतीय उद्योजकांपैकी एक होते हे काही उल्लेखनीय आहे. अलिकडेच, टॉरल इंडियाच्या वतीने, त्यांना सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्स (SIDM) २०२२ च्या ५ व्या वार्षिक सत्रात माननीय संरक्षण मंत्री श्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते "विशेष ज्युरी पुरस्कार - आयात पर्याय" प्रदान करण्यात आला.

## मंडळ + सल्लागार भूमिका, शिक्षण

पुणे, भारतातील सीओईपी येथून धातुकर्म अभियांत्रिकी आणि जर्मनीतील आचेन टेक्निकल युनिव्हर्सिटीमधून पदव्युत्तर पदवी मिळवल्यानंतर, भरत गित्ते यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये अलिकडच्याच एक्झिक्युटिव्ह लीडरशिप प्रोग्रामद्वारे आयुष्यभर शिक्षण सुरू ठेवले आहे. भरत गित्ते यांचा असा विश्वास आहे की, भारताला त्याची खरी क्षमता साध्य करायची असेल तर त्याच्या तरुण मनांना विकासाच्या मानसिकतेत विकसित केले पाहिजे. सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष म्हणून ते हे ध्येय पूर्ण करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, संघटना विद्यार्थ्यांशी, विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्यांमध्ये, संबंध आणि सक्षमीकरण वाढवत आहे. ते पुण्यातील भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ एंटरप्रेन्योरशिप अँड लीडरशिपच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत आणि सार्वजनिक भाषणाच्या त्यांच्या आवडीमुळे त्यांना विविध उद्योग मंचांवर बोलण्यासाठी आमंत्रित केले जाते.

## सामाजिक जबाबदारी

टॉरल इंडियामध्ये, नेहमीच राष्ट्र उभारणी आणि सामुदायिक विकासाच्या उद्दिष्टांसाठी वचनबद्ध तेणे कार्य केले आहे. संघटनेची उत्पत्ती राष्ट्राला एक चांगले उद्या देण्याच्या उद्दिष्टाशी संबंधित आहे. धोरणे, प्रयत्न आणि ऊर्जा नेहमीच राष्ट्राचे कल्याण वाढवण्याकडे निर्देशित आहेत. २०१९ मध्ये महाराष्ट्रात आलेल्या पुरामुळे सांगली आणि कोल्हापूरसह अनेक शहरांमध्ये प्रचंड हानी झाली होती, तेव्हा आम्ही बाधित भागात आवश्यक वस्तू, प्रामुख्याने अन्न, वाटप केले. सुमारे २०० अन्नसामग्रीच्या किट वाटण्याव्यतिरिक्त, आम्ही पूरग्रस्त भागातील मुलांना मदत करण्यासाठी १०० शालेय किटही वाटले. विविध सीएसआर उपक्रमांद्वारे समुदायांना मदत करण्यासाठी आणि आमची संपूर्ण परिसंस्था मजबूत करण्यासाठी टॉरल इंडिया वचनबद्ध आहे अशी माहिती टॉरल इंडियाच्या वेबसाईटवरून मिळाली.



"लोक जेव्हा त्यांची मानसिकता बदलतात तेव्हा विकास होतो." : भरत गित्ते

परळीकर म्हणून आपण उपस्थित रहायलाच हवं !!

## टॉरल इंडियाची थोडक्यात माहिती

टॉरल इंडिया भारतातील उधोगक्षेत्रात मोठ्या क्रांतीसाठी सज्ज आहे.
टॉरल इंडिया ही पुणे, महाराष्ट्र, भारतातील ७५० कर्मचाऱ्यांसह जागतिक दर्जाची एकात्मिक ॲल्युमिनियम फाउंड्री आहे आणि ऊर्जा, संरक्षण, रेल्वे, मरीन, एरोस्पेस, पायाभूत सुविधा आणि ईव्ही क्षेत्रांसारख्या विविध उद्योगांमध्ये जटिल ॲल्युमिनियम कास्टिंग सोल्यूशन्स प्रदान करते, ज्याने जनरल इलेक्ट्रिक, सीमेन्स, ह्योसंग, एबीबी आणि भारतीय सशस्त्र दलांसारख्या जागतिक क्लायंटना सेवा दिली आहे.

# परळी वैद्यनाथ नगरीची प्रतिमाहनन करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी आज मुलाखत !

**परळी वैद्यनाथ : नितीन ढाकणे**

तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक भरत गित्ते या परळीच्या भूमीपुत्राचा आज १६ फेब्रुवारी रोजी सन्मान व संवाद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. केवळ सन्मानच नाही तर थेट अन् ग्रेट : भरतभेट असे आगळेवेगळे या समारंभाचे स्वरूप आहे.या सोहळ्यास तमाम परळीकर नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. तौलर इंडिया प्रायव्हेट.लि. या जर्मन कंपनीचं नाव गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणावर चर्चेत आलं ते दावोस मध्ये विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी भारताने केलेले गुंतवणूक विषयीच्या सामंजस्य करारांमुळे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः दावोसमध्ये गेले आणि भरघोस आंतरराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक महाराष्ट्रात आणली,हे महाराष्ट्रासाठी गौरवाचेच आहे.परंतु तेवढ्याच किंवा त्यापेक्षाही मोठा गौरवाचा क्षण वाटला तो म्हणजे महाराष्ट्रातील त्यातही परळीचा भूमीपुत्र असलेले उद्योजक भरत गित्ते या एक आंतरराष्ट्रीय कंपनीचा प्रमुख म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर सामंजस्य करार करतोय. खरोखरच त्याक्षणी प्रत्येक परळीकराचा उर अभिमानाने भरून आला. ही आहे परळीच्या मातीची खरी गुणशक्ती. विविध क्षेत्रात कितीतरी असेच गुणी परळीकर आपापल्या क्षेत्रात कार्यकर्तृत्त्वाचा ठसा उमटवत आहेत. परळीच्या मातीची खरी गुणशक्ती काय याचे मुर्तीमंत उदाहरण परळीचा भूमीपुत्र असलेला उद्योजक भरत गित्ते हे आहेत. परळी वैद्यनाथ नगरीची प्रतिमाहनन करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी ही मुलाखत आहे. उद्योग जगतात तळपणाऱ्या या परळीच्या ताऱ्याचा सन्मान करणे त्याचबरोबर त्यांच्याशी आत्मिय संवाद साधून सर्वांसाठी प्रेरक होईल अशा पैलूंना उलगडून दाखवण्यासाठी उद्योजक भरत गित्ते यांची प्रकट मुलाखत होणार आहे. या सोहळ्यास परळीकर म्हणून आपण उपस्थित रहायलाच हवं. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी वैजनाथ येथे आज रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वा. उद्योग जगतात तळपणार्या या परळीच्या ताऱ्याचा सन्मान होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्याशी आत्मिय संवाद साधून सर्वांसाठी प्रेरक होईल अशा पैलूंना उलगडून दाखवण्यासाठी उद्योजक भरत गित्ते यांची परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व लेखक- साहित्यिक प्रा.राजकुमार यल्लावाड हे प्रकट मुलाखत घेणार आहेत. या सोहळ्यास परळीकर म्हणून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक आपण सर्व परळीकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

- बाजीराव धर्माधिकारी आणि प्रा. डॉ.राजकुमार यल्लावाड सर हे दोघे घेणार परळीचे भूमिपुत्र युवा उद्योजक भरत गित्ते यांची एक प्रेरणादायी प्रगट मुलाखत!!
- परळीकर आपापल्या क्षेत्रात कार्यकर्तृत्त्वाचा ठसा उमटवत आहेत. परळीच्या गुणशक्तीत अधिकाधिक वाढ व्हावी, अनेकांना प्रेरणा मिळावी यादृष्टीने आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक भरत गित्ते या परळीच्या भूमीपुत्राचा सन्मान करण्यात येणार आहे.









# ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेसच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण उद्योजक बनणार : सुरेश पवार

**आष्टी (प्रतिनिधी )**

येथील जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान येथे कृषी मंत्रालय भारत सरकार नाबार्ड आणि मॅनेज हैदराबादच्या माध्यमातून कृषी क्षेत्राशी निगडित असणाऱ्या शासकीय अनुदानातून उद्योजक बनण्याची संधी जयदत्त शिक्षण कृषी आणि जलविकास प्रतिष्ठान ने निर्माण केली यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले उद्योजक बनतील ही चांगली बाब असल्याचे प्रतिपादन विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन सुरेश पवार यांनी जयदत्त प्रतिष्ठान मध्ये ॲग्री क्लीनिक ॲग्री बिझनेस कोर्स च्या दहाव्या बॅचच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले कृषी मंत्रालय भारत सरकार, नाबार्ड आणि म्यानेज यांच्या वतीने आष्टी येथील जयदत्त प्रतिष्ठान येथे दीड महिन्याच्या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी बोलताना बाळासाहेब तळेकर म्हणाले कि जयदत्त प्रतिष्ठान मध्ये शिस्त, स्वछता, आणि वेळेच महत्व हे पाहून येथून काही तरी तुम्ही शिकले पाहिजे शेतीशी निगडित व्यवसाय करून ग्रामीण भागातील आपण तरुण उद्योजक बनणार याचा शेतकऱ्यांना अभिमान वाटेल आणि आपण सुरू करणाऱ्या व्यवसायास माझ्या शुभेच्छा आहेत या प्रसंगी राजेंद्र लाड, सिताराम पोकळे, संस्थेचे अध्यक्ष तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, मिसाळ एल. एस. प्राध्यापक म्हस्के, समन्वयक विद्या पोकळे आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# यांनाही सरळ कराच!

भ्रष्टाचार वा अन्य गंभीर गुन्ह्याखाली एखाद्यास शिक्षा झाल्यास त्यास भविष्यात सरकारी नोकरीचे दरवाजे कायमचे बंद होतात. अशी गुन्हा सिद्ध झालेली व्यक्ती कोणत्याही सरकारी कार्यालयात साध्या शिपायाची नोकरी करण्यासही अपात्र ठरते. मात्र अशी शिक्षा झाल्यानंतर सहा वर्षांनी सदर व्यक्ती लोकप्रतिनिधी कशी काय होऊ शकते, असा कळीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला असून या प्रकरणी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास नोटिसा बजावल्या आहेत. सर्वोच्च न्यायालय या मुद्द्याचा फडशा पाडू इच्छिते असे दिसते. याचे कारण आमच्या नोटिशींस उत्तर आले नाही तरी या प्रकरणी सुनावणी सुरू राहील असे न्यायालयाने स्पष्ट केले असून त्यासाठी ४ मार्च ही तारीख न्यायालयाने मुक्रर केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपंकर दत्ता आणि मनमोहन यांनी या नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाचा हा पवित्रा पाहून विविध शासकीय यंत्रणांनी त्यात आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केली. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल अ‍ॅक्ट' म्हणजे लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या दोन कलमांत बदल करू पाहते असा लावला जात असून तसे झाल्यास ही मोठी घटना ठरेल. हे पहिल्यांदाच होते आहे असे नाही. याआधीही निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांस संपत्ती आणि गुन्हे यांचा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे देणे बंधनकारक करण्याचा तसेच कोणत्याही गुन्ह्यात दोन वर्षे शिक्षा झाल्यास खासदारकी/आमदारकी आपोआप रद्द होईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानेच दिलेला आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधित्व कायद्यात याआधी दोन चांगल्या सुधारणा सर्वोच्च न्यायालयामुळेच झालेल्या आहेत. प्रत्यक्षात आल्यास ही आता तिसरी सुधारणा ठरेल. कोणताही सच्चा लोकशाहीप्रेमी या हस्तक्षेपाचे स्वागतच करेल.

तथापि ते करताना आपल्या न्यायिक व्यवस्थेस अधिक नि:स्पृह आणि अधिक निष्पक्ष व्हावे लागेल. असे नमूद करण्याची गरज म्हणजे सध्या विरोधी पक्षीय नेत्यांविरोधात खटल्यांवर खटले दाखल करण्याची नवी राजकीय संस्कृती. अलीकडे काही राजकीय पक्षांचे विरोधकांचा केवळ निवडणुकीय पराभव करून समाधान होत नाही. या विरोधकांस वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यातून कसे संपवता येईल याचा नुसताच विचार केला जातो असे नाही तर त्याप्रमाणे मार्ग चोखाळले जातात. दिमतीला केंद्रीय यंत्रणा आहेतच. त्यामुळे सत्ताधीशांस विरोध करणाऱ्यांस राजकीय लढाईसाठी उसंत राहात नाही आणि ते या न्यायिक लढायांतच अर्धमेले होतात. त्याचमुळे; ''न्यायिक प्रक्रिया हीच आपल्याकडे मोठी शिक्षा असते'' (प्रोसेस इज द पनिशमेंट) असे उद्गार काढण्याची वेळ साक्षात माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर आली. अशा परिस्थितीत कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यात विरोधकांस अडकवणे तितके अवघड राहात नाही. हे सर्व प्रत्यक्ष कोणा विशिष्ट राजकीय पक्षाकडून थेट होते असे नाही. पण या राजकीय पक्षाचे इतक्या संघटनांत इतके समर्थक आहेत की कोणीही उठून सत्ताधाऱ्यांस आडवे येणाऱ्यास आडवे करण्याचा हा उद्योग करू शकतो. त्यात निवडणूक आयोगाचा सरकारधर्म हा मुद्दा आहेच. एकेकाळी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार सहा वर्षांसाठी गोठवण्याचा निर्णय याच देशात घेतला गेला होता यावर विश्वास बसू नये; अशी आजची स्थिती. सर्व नियमांचा वरवंटा विरोधकांवरच फिरणार. अशा स्थितीत प्रमुख विरोधी नेते विविध आरोपांखाली दोषी ठरत गेले तर लोकशाहीच्या गळ्यालाच नख लागणार हे उघड आहे. तेव्हा आरोप सिद्ध झालेल्यांस लोकप्रतिनिधी बनता येऊ नये, हा सर्वोच्च न्यायालयाचा विचार स्तुत्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीतील संभाव्य धोका दुर्लक्ष करू नये असा.

तथापि राज्यपालांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेबाबत मात्र असा कोणताही धोका दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयात न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या पीठासमोर तमिळनाडू सरकार आणि राज्यपाल आर. एन. रवी यांच्या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या रवींचा उदय चेन्नईच्या राजभवनात झाल्यापासून सरकार आणि राज्यपाल यांच्यात वारंवार खटके उडत असून प्राय: त्यास राज्यपालच जबाबदार दिसतात. मुख्यमंत्री स्टालिन यांच्या सरकारला जमेल तितके आडवे जाणे हा एकमेव मुद्दा या महामहिमांच्या कार्यक्रमपत्रिकेवर असावा. सरकारने, विधानसभेने पारित केलेल्या विधेयकाचे रूपांतर हे महामहीम सरळपणे कायद्यात होऊच देत नाहीत. अशी जवळपास १० विधेयके या महामहीम रवींनी कायदा होण्यापासून रोखली. वास्तविक सरकारने घेतलेल्या एखाद्या निर्णयावर राज्यपालांस काही आक्षेप असल्यास तो निर्णय सरकारकडे परत पाठवण्याचा अधिकार राज्यपालांस आहे. तसे झाल्यानंतरही विधानसभेने तो निर्णय तसाच्या तसा घेतला तर मात्र राज्यपालांस त्यावर सही करावी लागते. पण या महामहिमांचा खाक्याच वेगळा. सरकारने एखादे विधेयक मंजूर करून त्यांच्याकडे पाठवले तर ते बराच काळ त्यावर निर्णयच घेत नाहीत. हो नाही आणि नाहीही नाही. सरकारी निर्णय हे महामहीम जमेल तितका काळ उबवणार. त्यानंतर फारच बोंब झाली की तो निर्णय सरकारकडे परत पाठवणार. मग सरकार सर्व आवश्यक प्रक्रिया पुन्हा पूर्ण करून तो निर्णय या महामहिमांकडे पाठवणार. मग महामहीम पुन्हा त्याकडे दुर्लक्ष करणार आणि पुन्हा ओरडा झाला तर त्या निर्णयाचा चेंडू राष्ट्रपतींच्या अंगणात ढकलणार. म्हणजे निर्णय लटकला.

राजकारणातील अतृप्त आत्म्यांस शांत करण्याचा मार्ग म्हणजे राज्यपालपद असे म्हणता येईल अशी सद्या:स्थिती. एकापेक्षा एक दिव्य महामहीम सध्या विविध राजभवनांत वास्तव्य करून आहेत. भाजपविरोधी सरकारची जमेल तितकी अडचण करणे हाच या महामहिमांचा एककलमी कार्यक्रम. महाराष्ट्रात भगतसिंग कोश्यारी यांनी घातलेला धिंगाणा याच जातकुळीतला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या भगतसिंगास सहन केले. पण तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टालिन यांनी मात्र त्यांच्या महामहिमांस न्यायालयात खेचले. त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू असून न्यायाधीश उपस्थित करत असलेल्या प्रश्नांतून या महामहिमाचे पुरते वस्त्रहरण होताना दिसते. ''तुम्ही विधेयक परत पाठवण्याची कारणे राज्य सरकारला सांगितलीत का'', ''तुम्हाला एखाद्या विधेयकावर निर्णय घ्यायला किती वेळ हवा'', ''तुमची स्वत:ची वेगळीच कार्यपद्धती दिसते'' अशा शेलक्या प्रश्नांद्वारे न्यायाधीश या महामहिमांच्या वर्तनातील नियमबाह्यता अशा प्रकारे दाखवून देत आहेत ती पाहिल्यावर माजी पोलीस अधिकारी असलेल्या या रवीने स्वत:हून राजभवनातून मावळायला हवे. पण तसे होण्याची काही शक्यता नाही.

# 18 ते 20 फेब्रुवारी दरम्यान श्री संत गजानन महाराज प्रगट दिन सोहळ्याचे आयोजन

**परळी (प्रतिनिधी)**

दरवर्षी प्रमाणे याहिवर्षी संत श्रेष्ठ श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संत गजानन महाराज विश्वस्त मंडळ विद्यानगर परळी च्या वतीने १८ ते 20 फेब्रुवारी दरम्यान चरित्र पारायण सोहळा व हरिनाम सकिर्तनाचा त्रिदिवसीय कार्यक्रम होणार आहे.

दैनिक धार्मिक कार्यक्रमा मधे पहाटे 4 ते 6 काकडा आरती,7 ते 10 चरित्र पारायन,10 ते 12 महिला भजनी मंडळ यांचे भजन, तर रात्री 8 ते 11 या वेळेत कीर्तन होणार आहे. दि. १८ फेब्रु. रोजी श्री ची पुजा,अभिषेक व नंतर 10 ते 12 या वेळेत राधाकृष्ण महिला भजनी मंडळ यांचे भजन,तर रात्री 8 ते 11 या वेळेत ह.भ.प. श्री श्रीहरी महाराज पुरी आष्टी यांचे कीर्तन होणार आहे. १९ फेबु . रोजी गजानन महाराज महिला मंडळ यांचे भजन,तर रात्री ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे यांचे कीर्तन होणार आहे. 20 फेबुवारी रोजी सोहळा सांगता दिनी सकाळी 8 ते 10 श्री ची पालखी मिरवणूक, तर सकाळी 10 ते 1 या वेळेत ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर




महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

मागील 22 वर्षापासून या धार्मिक सोहळ्याची अखंड परंपरा सुरु असुन विश्वस्त मंडळ यांच्या अथक परिश्रमा तून याठिकाणी धार्मिक कार्यक्रमासह विविध समाजोपयोगी उपक्रमही घेण्यात येतात. यामधे रक्तदान,परिसर स्वच्छता,दर गुरुवारी भजन यांचा समावेश असतो. मंदीर स्थापनेपासुन दर गुरुवारी श्री ना पिठल भाकरी चा नैवेद्य, हरीपाठ, आरती,पुजा असे कार्यक्रम घेण्यात येतात. विश्वस्त मंडळासह परिसरातील भाविक भक्त आदींचा यात हिरिरीने सहभाग असतो. प्रगट दिन सोहळ्या निमीत्त सलग तिन दिवस या ठिकानी यात्रेचे स्वरुप पहावयास मिळते. याही वर्षी १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान होत असलेल्या या भरगच्च धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

- **हरिनाम संकीतर्नाचा त्रिदिवसीय कार्यक्रम**
- **मागील 22 वर्षांची अखंडीत परंपरा**
- **धार्मिक कार्यक्रमांसह विविध उपक्रम**
- **परळीसह पंचक्रोशीतून भाविकांची अलोट गर्दी**

# ओम तांबडे यांचे राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश !

## "कार्यकारी अभियंता सुरेश गर्जे यांच्या हस्ते ओम तांबडेचा गौरव

**परळी/ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या "लिपिक-टंकलेखक' व कर सहायक" परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन गुणवत्ता यादी मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अंत्यन्त महत्वाच्या या परीक्षेत तळेगाव येथील ओम केशवराव तांबडे यांनी उज्वल यश संपादन केले आहे. या त्याच्या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यश नक्की मिळते हे ओम यांनी दाखवून दिले आहे. एका सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या मुलाने आपल्या प्रयत्न आणि मेहनतीच्या जोरावर मानाच्या परीक्षेत यश मिळविले ही कौतुकाची गोष्ट आहे. ओमचे वडील केशवराव हे शेतकरी आहेत आणि त्यांचे लहान बंधू अशोक तांबडे



हे औष्णिक वीज केंद्रात अभियंता म्हणून खाजगी कंपनीत काम करतात.भावाच्या पाठीशी अंत्यन्त खंबीरपणे उभे राहून सर्व प्रकारचे सहाय्य पुरविले. परिस्थिती कशीही असली तरी मेहनतीच्या जोरावर आकाशाला गवसणी घालता येते हेच यातून दिसून येते. अशा प्रकारे यश मिळवून ओम यांनी आपल्या आईवडिलांच्या कष्टाचे सार्थक केले.

या त्याच्या यशाबद्दल औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा हाताळणी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यकारी अभियंता सुरेश गर्जे साहेबांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल देवून गौरव करण्यात आला. अतिरिक्त कार्यकारी अभियंता गजानन आरोळे, शाहूराज येवते, विशाल गिरे ,उपकार्यकारी अभियंता गणेश बांगर, इम्रान मणियार, चंद्रकांत कोहाळे, गजेंद्र धनोरीया तसेच बी एस मुंडे, सारंग धर्माधिकारी, विष्णु सोळुंके व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या या छोटेखानी सत्कार कार्यक्रमात Add E E शाहूराज येवते यांनी आपले मनोगत व्यक्त करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. त्यांचे लहान भाऊ अशोक तांबडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ मुंबईत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पाहुण्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला

**मुंबई प्रतिनिधी : रमाकांत मुंडे**

आयोजक गणेश साहू आणि शीबा शेख यांच्या नेतृत्वाखाली शीबा मीडिया वर्कशॉपने हा कार्यक्रम आयोजित केला होता. दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खानसह अनेक प्रसिद्ध व्यक्तींना सन्मानित करण्यात आले मुंबई भारतासारख्या विविध आणि उत्साही देशात, असे असंख्य व्यक्ती आहेत जे त्यांच्या जीवनात विविधता आणण्यासाठी पुरेसे प्रयत्न करतात. मतप्रसारकांपासून ते कलाकारांपर्यंत, हे व्यक्ती आपल्या समाजाच्या वर्गाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या प्रशंसनीय योगदानाची दखल घेत, भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ ८ फेब्रुवारी २०२५ रोजी अंधेरी पश्चिम, मुंबई येथे शीबा मीडिया वर्कशॉपद्वारे आयोजित केले जाईल. या कार्यक्रमाचे नेतृत्व आयोजक गणेश साहू आणि शीबा शेख करत आहेत. भारतातील जीवन स्वातंत्र्य साजरे करणे




आणि नि:स्वार्थपणे त्यांच्या समुदायाची सेवा करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या लोकांचा सन्मान करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या अढळ भावनेला आणि दानशूरपणाला हा पुरस्कार सोहळा मान्यता देतो.

प्रतिष्ठित प्रमुख पाहुणे - दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान, हारून खान (शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे वर्षातील सर्वात पात्र आमदार) अँड्रीज डू प्रीझ (मॉडेल; आंतरराष्ट्रीय शो दिग्दर्शक आणि सेलिब्रिटी), सिंडी नाओमी कीट संस्थापक एमडब्ल्यूआय इंटरनॅशनल, सोन्जा अ‍ॅडोनिस ३५ ब्युटी क्वीन इंटरनॅशनल अतिथी बी.एन. तिवारी-अध्यक्ष एफडब्ल्यूआयसीई, विजय शाह भाजप वर्सोवा विधानसभा, साजिद पटेल, भीमराज जहांगीर, एजाज खान (अभिनेता, दिग्दर्शक), अरविंद कुमार वाघेला (सर्वोत्तम अभिनेता (सुपरस्टार राजस्थान फिल्म इंडस्ट्री), सौरभ शर्मा (एमडी-सौरभ एंटरटेनमेंट), पल्लवी शर्मा (सीईओ-सौरभ एंटरटेनमेंट), हाजी सैफ शेख (व्हीपी - मनसे कायदेशीर निर्माता), राजेंद्रसिंह राठोड (चित्रपट निर्माता - राजभा फिल्म्स), वकार शेख - (झी५ चित्रपट सायलेन्स-२ मधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार विजेते), सुनील पाल (कॉमेडियन आणि अभिनेता) ईशान मसीह अभिनेता, डान्सर (फेम- बिग बॉस), जैनब पात्रा (अभिनेत्री प्रभावशाली), जानमन (रॅपर/गाणे लेखक), जीतू गुप्ता (प्रसिद्धी- भाभी जी घर पे है), अरमान अहमद (प्लेबॅक सुफी गायिका), क्वीन बरखा आहुजा (बहुमुखी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय गायिका आणि रॅपर), नवाज साजिद पटेल (प्रभावशाली आणि युट्यूबर), शहनाज अहमद अली खान (सामाजिक कार्य, शहनाज प्लांट नर्सरीचे मालक), गजानन प्रभाकर चारी (पोलिस हेड कॉन्स्टेबल टुरिस्ट पोलिस युनिट्स गोवा पोलिस), पूजा पांडे (अभिनेत्री आणि मॉडेल), राजा अली अभिनेत्री प्रीती सिंग (बॉलिवूड अभिनेत्री), रजनी मेहता (बॉलिवूड अभिनेत्री), रमेश गुजराल (पॅरा/ब्लॅक कॅट कमांडो आणि अभिनेता), या लोकांनी त्यांच्या क्षेत्रात केवळ उत्कृष्ट कामगिरी केली नाही तर सकारात्मक बदल घडवून आणला आहे आणि कलाकारांनाही असेच करण्यास प्रेरित करण्यासाठी त्यांच्या व्यासपीठाचा वापर केला आहे. भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ चे उद्घाटन सिमरन आहुजा (सेलिब्रिटी अँकर, मिस इंडिया, अभिनेत्री, टीव्ही टॉक शो होस्ट, ग्लोबल एम्सी, लोकनृत्याची राणी) यांच्या हस्ते झाले.

# सद्गुरु आश्रमशाळेच्या बालचमूंनी चांदोली प्रकल्पग्रस्तांची घेतली भेट

## पत्राच्या माध्यमातून सरकारकडे मांडणार प्रश्न सोडवण्याची करणार विनंती

**शिराळा / प्रतिनिधी**

मणदूर (ता. शिराळा) येथील हुतात्मा स्मारक परिसरामध्ये चांदोली प्रकल्पग्रस्तांचे विविध मागण्यांसाठी गेल्या 36 दिवसापासून आंदोलन सुरू आहे. महिना उलटून गेला तरी प्रशासनाने त्यांची दखल घेतलेली नाही. वर्तमानपत्रातून ही बातमी वाचल्यानंतर इस्लामपूर येथील सद्गुरु आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी थंडी वाऱ्यात बसलेल्या या प्रकल्पग्रस्तांची भेट घेण्याचे ठरवले. विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार शाळेने नियोजन केले. कब बुलबुल आणि स्काऊट गाईडचे पथक घेऊन तब्बल 200 हून अधिक विद्यार्थी व शिक्षक प्रकल्पग्रस्तांच्या भेटीला आले.

शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी आंदोलकांची भूमिका समजून घेतली. पत्राच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सरकार दरबारी पाठवण्याची तयारी दर्शवली. आपल्या लेकरा बाळांना सोडून महिनाभरापासून उघड्यावर बसलेल्या प्रकल्पग्रस्तांना लवकर घरी जाता यावं म्हणून शासनाने त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात अशी विनवणी सरकारला हे बालचमू आता करणार आहे.

जाता जाता मणदूर गाव तसेच हुतात्मा स्मारक परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी स्वच्छ करून स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या घोषणा देत या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. स्थानिक शिक्षक सतीश पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या नाष्ट्याची व्यवस्था केली. धरणाच्या पायथ्याला निसर्गाच्या सानिध्यात तंबू ठोकून स्काऊट गाईड कब बुलबुल च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवले. दगडाच्या चुली मांडून स्वयंपाक केला. सांस्कृतिक कार्यक्रमातून मनोरंजन केले. मुख्याध्यापक सचिन पाटील, आष्पाक आत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी संयोजन



केले.

सरपंच शोभाताई माने, माजी सरपंच वसंत पाटील, राम माने, सावळाराम पाटील, जी. के. पाटील, बबन पवार, विष्णू पाटील,आनंदा सावंत, अजित चौगुले, वसंत चौगुले, दाजी कांबळे, अशोक पाटील यांच्यासह ग्रामस्थ प्रकल्पग्रस्त यांनी बालचमूनी केलेली स्वच्छता आणि आंदोलनाला दिलेली भेट याबद्दल कौतुक करत शाळेचे आभार मानले

समाजातील विविध प्रश्नांची जाण व्हावी विद्यार्थी आत्मनिर्भर व्हावेत, स्वयंशिस्त यावी, या उद्देशाने स्काऊट गाईड आणि कब बुलबुल पथकाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला.मणदूर सरपंच व ग्रामस्थांनी सहकार्य केले. स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना समजले, आंदोलन म्हणजे काय? ते का केले जाते?कोणत्या मार्गाने केले जाते? याची जाणीव त्यांना झाली. कृतिशील शिक्षण देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला

**- सचिन पाटील, आष्पाक आत्तार**
**मुख्याध्यापक**

## साप्ताहिक संवाद

इंधन बचतीवर जनजागरणपर अभियान सक्षम पेट्रोल,डिझेल,सीएनजी वायू,या सारख्या जीवाष्म इंधनाचा नैसर्गिक साठा हा आता संपुष्ठात येत आहे. शिवाय याच पारंपरिक इंधनाच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होऊन कार्बन डायओकसाईड आणि कार्बन मोनॅक्ससाईड सारख्या विषारी वायूमुळे पर्यावरण देखील दूषित बनलेले आहे,म्हणूनच जीवाष्म इंधनाची बचत आणि पर्यायी नैसर्गिक प्रदूषणमुक्त इंधनाचा वापर वाढविण्यासाठी भारत सरकारच्या तेल आणि पेट्रोलियम मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी सक्षम हे अभियान संपूर्ण देशभर राबविले जाते. यंदा १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात येत असलेल्या या अभियाना संदर्भात भारत पेट्रोलिअमचे राज्यस्तरीय समन्वयक श्री. उमेश कुलकर्णी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद. १]सक्षम हे अभियान नेमके काय आहे?आणि या अभियानाचा उद्देश काय आहे? सक्षम अर्थात संरक्षण क्षमता महोत्सव.आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षा,शाश्वत विकस आणि पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने सुरु केलेला एक महत्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे जीवाष्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रोखणे,परकीय तिजोरीवरील वाढता भार कमी करणे,आणि जीवाश्म इंधन ज्वलनामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामांपासून पर्यावरणाचे संरक्षण करणे,त्यासाठी प्रदूषणमुक्त नैसर्गिक इंधनाचा वापर वाढविणे हा या अभियानाचा उद्देश आहे. पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी भारत सरकारच्या तेल विपणन कंपन्या आघडीवर आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे सक्षम अभियान असून यंदा संपूर्ण देशभर १४ ते २८ फेब्रुवारी या पंधरवड्यात हे अभियान राबविले जाणार आहे.

### जनजागरण केले जाणार आहे?

दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षी सक्षमची संकल्पना हि 'हरित आणि स्वच्छ ऊर्जेचा अंगीकार आणि स्वच्छ पर्यावरणाचा स्वीकार' हि आहे.या अभियानाचा शुभारंभ मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रात अधिकृतरीत्या एका कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला आहे. या पंधरवड्यात इंधन बचत आणि हरित ऊर्जा या विषयावर शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर गट चर्चा,वाद विवाद स्पर्धा,निबंध






,चित्रकला,भित्तीचित्र स्पर्धांचे आयोजण,पत्रकारांसाठी लेख स्पर्धा चे आयोजण करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यातील वाहन चालकांसाठी विविध स्पर्धा असतील,शिवाय आकाशवाणी आणि दूरदर्शन सारखया माध्यमातून टॉक शो असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या अभियानात शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी,स्वयंपाक करणाऱ्या गृहीनि ,इंधनाचा वापर करणारे वाहन चालक,शेतकरी,सर्वसामान्य नागरिक,शाळा,ग्रामपंचायती असा सर्वांचा सहभाग असणार आहे.

### सोहळा कसा असणार आहे?

- **सक्षम अभियाना अंतर्गत संपूर्ण पंधरवड्यात इंधन बचतीवर विविध स्पर्धांचे आयोजण केले जाणार आहे. सक्षम या अभियानाचा समारोप सोहळा १ मार्च रोजी मुंबईत आयोजित केला जाणार असून या सोहळ्याला राज्याच्या तेल आणि पेट्रोलियम मंत्र्यांना आमंत्रित केले जाणार आहे. शिवाय काही सेलिब्रिटी मान्यवर देखील असतील. या सोहळ्यात विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला जाणार असून याच सोहळ्यात इंधन बचतीवर आधारित शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लघुनाटिका आणि संगीतिकेच देखील आयोजण केले जाणार आहे. याच कार्यक्रमात सक्षम अभियानाची संपूर्ण राज्यात परिपूर्तता कशा प्रकारे झाली याचा आढावा घेण्यात येईल.**

## क्रीडांगण

उषा इंटरनॅशनलची मुंबई इंडियन्स महिला संघा सोबत भागीदारी भारतातील आघाडीचा ग्राहकोपयोगी वस्तू ब्रँड असलेली उषा इंटरनॅशनल २०२५ मध्ये होणाऱ्या महिला टी २० लीगसाठी सलग तिस ऱ्या वर्षी मुंबई इंडियन्स महिला संघासोबतची भागीदारी सुरू ठेवणार आहे. यासंदर्भातील अधिकृत घोषणा कंपनीने केली आहे. महिला खेळाडूंचा विकास आणि त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या धोरणासोबतच महिला क्रीडा स्पर्धांना चालना देण्यासाठी उषा इंटरनॅशनल ची कटिबद्धता या सहकार्याने अधिक बळकट झाली आहे. संघाची ओळख ठरलेल्या निळ्या आणि सोनेरी जर्सीचे बदललेले रूप हा या हंगामातील दिसून येणारा सर्वात ठळक बदल असेल.

शहरा च्या किनारपट्टीपासून प्रेरणा घेत या जर्सीवर कोरलमध्ये खडकाळ पॅटर्न आला आहे. विश्वास आणि महत्त्वाकांक्षेचे प्रतीक असलेल्या सुप्रसिद्ध निळ्या आणि सोनेरी रंगाला ताकद आणि लवचिकतेचे प्रतीक असलेल्या कोरलने सजविण्यात आले आहे. ही नवीन जर्सी मुंबईच्या भावनेची दृश्य घोषणा आहे.ही बहुप्रतिक्षित मालिका १४ फेब्रुवारी रोजी वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर सुरू होईल. त्यामध्ये सहा सामने होतील आणि त्यानंतर पुढील सहा सामने बेंगळुरूला खेळविण्यात येतील. लखनौ येथे पहिल्यांदाच सामने होणार असून तिथे चार सामने आयोजित करण्यात आले आहे. हंगामातील शेवटचे सामने क्रिकेट क्लब ऑफ इंडिया (सीसीआय) येथे खेळविण्यात येतील. मुंबई इंडियन्स महिला संघ अनुक्रमे १० आणि ११ मार्च रोजी घरच्या मैदानावर गुजरात आणि बंगळुरू विरुद्धच्या सामन्यांसह लीग टप्प्याचा शेवट करेल.एमआय महिला संघाने २०२३ मध्ये झालेल्या पहिल्या टी-२०लीगमध्ये विजेत्याचा करंडक जिंकून आणि २०२४ मध्ये उपांत्य फेरी गाठून दोन उत्तम हंगामांचा अनुभव घेतला आहे. यावर्षी २३ एकदिवसीय सामन्यांमध्ये २३ बळी घेऊन छाप पाडणारी राजस्थानची अक्षिता माहेश्वरी, अष्टपैलू संस्कृती गुप्ता आणि दक्षिण आफ्रिकेची अष्टपैलू नादिन डी क्लार्क यांना संघात जागा देऊन संघाला आणखी बळकटी देण्यात आली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली आणि न्यूझीलंडला पहिल्यांदाच महिला टी२० विश्वचषक विजेतेपदापर्यंत घेऊन गेलेल्या अमेलिया केरच्या सातत्यपूर्ण दर्जेदार कामगिरीसह उत्तम क्रिकेटचा अनुभव घेण्यास चाहते उत्सुक आहेत. या हंगामातील एमआय महिला संघातील अन्य खेळाडूंमध्ये यास्तिका भाटिया, नाटाली सायव्हर-ब्रंट, हेली मॅथ्यूज, शबनीम इस्माईल आणि सायका इशाक यांचा समावेश आहे.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# दिव्यांगाची ऑनलाईन प्रमाणपत्र तालुक्यात सेंटर सुरू करण्यासाठी डॉ. संतोष मुंडे यांनी घेतली आरोग्यमंत्री यांची भेट

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

राज्यातील सर्व दिव्यांगाची ऑनलाईन प्रमाणपत्र तालुक्यात सेंटर चालू करण्यासाठी दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी राज्याचे आरोग्य मंत्री मा. श्री प्रकाश आबिटकर यांची नुकतीच भेट घेतली होती. त्यांनी याबाबत सविस्तर चर्चा करून ऑनलाईन प्रमाणपपत्रासाठी जीआर पण काढल होता. त्यानुसार बीड रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. अशोक थोरात यांनी बीड जिल्ह्यात तालुका दिव्यांग ऑनलाईन प्रमाणपत्र काढण्यासाठी एका पत्रावदरे आदेश दिले असून यासाठी एक डॉकटराची टीमपण नेमण्यात आली आहे. यासाठी दिव्यांगाचे कैवारी डॉ. संतोष मुंडे यांनी वेळोवेळी पाठपुराव्यामुळे आता दिव्यांग बांधवाना तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी ऑनलाईन प्रमाणपत्र मिळणार आहे. बीड जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू झाली आहे. आता दिव्यांग बांधवाची हेळसांड थांबणार आहे. डॉ. अशोक थोरात यांचे दिव्यांग बांधवानी आभार मानले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिव्यांगाना त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाणात मिळण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती, वारंवार शासकीय रुग्णालयात चकरा माराव्या लागत होत्या, त्यात दिव्यांगांचे ऑनलाईन प्रमाणपत्र आणि या त्रासात सुद्धा अनेक कि. मी चा प्रवास करून त्यांना हे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळत नसे, कधी कामकाज बंद, तर कधी अधिकारी जागेवर नाहीत एक ना अनेक अशा समस्यांचा सामना करून कुठे त्यांना हे प्रमाणपत्र मिळे. या सर्व अडचणी जेव्हा दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या लक्षात आल्या त्यावेळी त्यांनी पुढाकार



घेतला. मंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या सूचनेवरून डॉ संतोष मुंडे यांनी या संदर्भात राज्यातील सर्व दिव्यांगाची ऑनलाईन प्रमाणपत्र तालुक्यात सेंटर चालू करण्यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री माननीय श्री प्रकाश आबिटकर साहेबांची भेट घेतली होती व त्याचा जीआर पण निघाला होता त्यानुसार बीड

## डॉ. संतोष मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे आता तालुक्याच्या ठिकाणी मिळणार दिव्यांग ऑनलाईन प्रमाणपत्र; बीड जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु

रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉक्टर अशोक थोरात यांनी बीड जिल्ह्यात तालुका दिव्यांग ऑनलाईन प्रमाणपत्र निघण्यासाठी ऑर्डर काढण्यात आली आहे व डॉक्टरची नेमणूक करण्यात आली आहे.

बीडचे जिल्हा चिकित्सक डॉ अशोक थोरात यांना ऑनलाईन प्रमाणपत्रा संदर्भात पत्र देऊन, ऑनलाईन प्रमाणपत्राची सुविधा उपजिल्हा रुग्णालयात सुरू करावी अशी सूचना केली त्याच अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक यांनी बीड जिल्ह्यात दिव्यांगांचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळन्याची तसेच, नूतनीकरण, सुविधा सुरू केली आहे परळी वैजनाथ येथे महिन्याच्या प्रत्येक दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी, तर बीड जिल्हा रुग्णालयात बुधवारी, उपजिल्हा रुग्णालय गेवराई शनिवार पहिला, माजलगाव ग्रामीण रुग्णालयात सोमवार पहिला, उपजिल्हा रुग्णालय केज येथे मंगळवार दुसरा, ग्रामीण रुग्णालय आष्टीत मंगळवार दुसरा मिळणार अपंगांचे ऑनलाईन प्रमाणात मिळणार आहे तरी दिव्यांग नी सुविधा घ्यावी असे आवाहन केले आहे. यासुविधेमुळे दिव्यांगांची होणारी परेशानी दूर होऊन, आत्ता त्यांना अंबाजोगाई व बीड ला नजतां तालुक्याचे

## डॉ. अशोक थोरात यांचे दिव्यांग बांधवानी मानले आभार

ठिकाणी त्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र तसेच नूतनीकरण या सुविधानांचा लाभ घेता येणार आहे. या निर्णयाचे दिव्यांग बांधवांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

दिव्यांगाचे नेते डॉ. संतोष मुंडे हे नेहमीच दिव्यांगाच्या मदतीला धावून येणारे व्यक्तिमत्व आहेत. दिव्यांग बांधवाच्या मदतीसाठी सदैव कटीबद्ध आहेत. दिव्यांग बांधव यांना तालुक्याचे ठिकाणी त्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र तसेच नूतनीकरण या सुविधानांमुळे त्यांना लाभ होणार आहे.




# राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत कोल्हापूरला पहिले पारितोषिक

## कलावंतांच्या कलेला प्रोत्साहन दिले पाहिजे: आ. बालाजी कल्याणकर

**परळी ( प्रतिनिधी)**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित २७ वी राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत कोल्हापूरच्या लोकनृत्य संघाने बाजी मारत पहिले बक्षीस पटकाविले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने २७ वी राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा शुक्रवारी पार पडली. या स्पर्धेत कोल्हापूरच्या संघाला पहिले पारितोषिक मिळाले. तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस नायगावच्या संघाने पटकाविले.

या स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे बक्षीस वरळीच्या संघाला मिळाले. तर उत्तेजनार्थ पहिले बक्षीस नागपूर व उत्तेजनार्थ द्वितीय बक्षीस चिपळूण संघाने पटकाविले. विजेत्या संघांना बक्षीसाचे धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण नांदेड दक्षिणचे आमदार बालाजी कल्याणकर, कल्याण आयुक्त रविराज इळवे, उपकल्याण आयुक्त नंदलाल राठोड, सहा. कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, परिक्षक जावेद शेख, किरण टाळके, शिवकुमार चवरे यांच्या उपस्थितीत झाले.

कलावंत कला सादर करण्यासाठी खुप मेहनत आणी कष्ट घेतात. त्यांच्या कलांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. शासनकलावंतांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आसल्याचे आ. बालाजी कल्याणकर म्हणाले. प्रास्ताविक कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले तर आभार उपकल्याण आयुक्त नंदलाल राठोड यांनी मानले.

# २५ ते 30 शाखा असणाऱ्या संस्थेला जे जमत नाही ते दत्त ने केले : शैलेश कोतमिरे

## कर्मचारी निवृत्ती सन्मान समारंभ संपन्न

**शिराळा | प्रतिनिधी**

२५ ते ३० शाखा असणाऱ्या पत संस्थाना जे जमत नाही ते दत्त पत संस्था करून दाखवते असे प्रतिपादन राज्याचे सहकार खात्याचे अप्पर आयुक्त व निबंधक शैलेश कोतमिरे यांनी केले.श्री दत्त नागरी सहकारी पत इस्लामपूर चे कार्यलक्षी संचालक संजय हिरवे निवृत्ती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण चे आयुक्त अनिल कवडे हे होते.

येथील कुसूमताई राजाराम पाटील महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात चेअरमन प्रा.डॉ.श्रीकांत चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा.चव्हाण,संस्थापक प्राचार्य डॉ.पी.बी. कुलकर्णी व व्हा.चेअरमन बी.टी.निकम यांनी मान्यवरांचे येथोचित सत्कार केले. प्रधानशाखा प्रमुख दिनेश हसबनीस यांनी




प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी संस्थेचे कार्यलक्षी संचालक संजय हिरवे हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत झाल्या बद्दल त्यांचा व सुविद्य पत्नी सौ.वनिता हिरवे यांचा सत्कार केला.

यावेळी बोलताना शैलेश कोतमिरे म्हणाले की या पतसंस्थेच्या संपर्कात आले की माणूस प्रेमात पडतो हे सिध्द झाले.गरजू व्यक्तीला आपल्या पायावर उभे करण्याचे काम पत संस्था करत आहे.संस्थेच्या याच जिल्ह्यात चार शाखा आहेत,ठेवी ११६ कोटी आहेत तर कर्ज वाटप ८६ कोटी कर्ज वाटप झाले आहे,संस्थेचा अहवाल,इमारत व सर्व प्रगती पाहता जे २५ ते ३० शाखा असणाऱ्या संस्थेला जे जमले नाही ते दत्त नागरी पत संस्थेने केले आहे.संस्था काढणे सोपे असते पण चालवणे महाकठीण असते.आर्थिक निकष सांभाळत समाज हित,सभासद हित जोपासत प्रगती करावी लागते हे सर्व दत्त पत संस्थेने केले आहे असे सांगितले. .. अध्यक्षस्थाना वरून बोलताना अनिल कवडे म्हणाले संजय हिरवे यांच्या बद्दल अनेक मान्यवरानी गौरवोद्गार काढले आहेत त्यावरून त्यांच्या कामाची पोच पावती मिळते.सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांकडून त्यांचे गुण इतर कर्मचाऱ्यांनी घ्यावेत. संस्थेचा अहवाल वाचला असता १ रूपया पासून ११६ कोटी ठेवीचा प्रवास,या प्रवासात सर्वांचा खारीचा वाटा आहे. जनकल्याणाचे साधन सहकारी संस्था आहेत,समर्पित सेवा देणे महत्वाचे आहे. शाखा किती यापेक्षा योगदान महत्वाचे आहे.दहा हजार सभासद असणारी संस्था अनेक कुटुंबाना आधार देत आहे.संस्थेची प्रतिष्ठा उंचावणे हे संचालक,कर्मचाऱ्यांच्या हातात आहे,कर्मचारी सद्विचारी,सदवर्तन असणारे असावेत,आत्मियता, आदर पाहिजे, कामाबद्दल कृतज्ञता पाहिजे असेही सांगितले.मन, बुद्धी शक्ती हि जगाच्या कल्याणासाठी आहे हे लक्षात ठेऊन माझे कर्म हे सत्कर्मात येतात की दुष्कर्मात येतात हे पाहणे महत्वाचे आहे.संस्था बांधणी,देश बांधणीत सदविचारी वृत्तीची माणसे हवीत असे सांगुन सर्वांनी संस्था आणि देशासाठी नेहमी कार्यरत रहावे असे आवाहन केले.

यावेळी जिल्ह्याचे सह.निबंधक मंगेश सुरवेसे,माजी चेअरमन श्रीमती सुनिता कुलकर्णी,प्राचार्य डॉ. दिपक देशपांडे,सौ. सुखदा महाजन,महेश कबाडे,दिपक साळवी,अरविंद जाधव, विनायक हिरवे,यु. जी.डफळापूकर यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला संचालक, सभासद, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील सहकार अधिकारी, हितचिंतक, कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.सूत्रसंचलन विनायक गायकवाड यांनी केले तर आभार सहा. कार्यलक्षी संचालक संजय विभूते यांनी मानले.

# भोपल्याचा राजेश बनला महसूल सहाय्यक !

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते- प्रा.टी.पी.मुंडे

**परळी (प्रतिनिधी )**

तालुक्यातील भोपला हे गाव डोंगराळ भागात वसलेले आहे. भोपला गावचा राजेश गंगाराम मुंडे या युवकांनी महसूल सहाय्यक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली आणि त्याच्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते हा आदर्श घालून दिला आणि आपल्या आई-वडिलांचे तसेच आपल्या गावाचे नाव उंचावले असे प्रतिपादन महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांनी केले. त्यांच्या संपर्क कार्यालयात त्याचा यथोचित शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीस त्याला शुभेच्छा दिल्या तसेच त्याचे वडील गंगाराम मुंडे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला त्या परीक्षेत त्याने घवघवीत यश संपादन केले. त्याचे आई-वडिलांनी काबाड कष्ट करून त्याला शिकवले. त्याचे सततचे परिश्रम जिद्द आणि



चिकाटीच्या जोरावर त्याने यश संपादन केले. त्याचे वडील लहानपणापासून ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करतात आजही ते कार्यालयात आपली सेवा देतात. त्याची आई मोलमजुरी करून मुलाबाळांचे शिक्षण आणि संसार चालवते. अतिशय गरीब परिस्थितीतून त्याने महसूल सहाय्यक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली आणि एक आदर्श ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घालून दिला. त्याने मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

यावेळी सूर्यकांत मुंडे, वडील गंगाराम मुंडे, प्रा. विजय मुंडे, जि.प. सदस्य प्रदीप भैय्या मुंडे (बबलू शेठ), ब्रह्मदेव मुंडे, भागवत मुंडे, भोपला गावचे सरपंच बाळासाहेब मुंडे , नंदनजचे पोलीस पाटील गुट्टे , पिंटू डापकरआदी उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**परळी( प्रतिनिधी)**

परळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अरुण गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते श्री.पप्पू गित्ते दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बालासाहेब फड यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

क्रांतिसिंह संत सेवालाल महाराज 15 फेब्रुवारी 1739 -4 जानेवारी 1773) हे भारतीय समाजसुधारक होते. संत सेवालाल महाराज यांच्या जन्म 15 फेब्रुवारी 1739 रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपुर जिल्ह्यातील गुटी तालुक्यात गोलाल डोडी गावात झाला.




यावेळी वैद्यकीय अधीक्षक अधीक्षक डॉ अरुण गुट्टे साहेब सामाजिक कार्यकर्ते श्री .पप्पू गित्ते ,दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बालासाहेब फड,श्री .नागरगोजे ,गीताजी, श्री राऊत, श्री शिरोळे ,परिसेविका श्रीमती टाकळकर, श्रीमती कुलकर्णी ,श्रीमती जगतकर, श्रीमती गिरी ,श्रीमती भावले, श्रीमती मुंडे, श्रीमती वाळले, श्री गिरी इत्यादी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# केंद्राने पत्रकार संरक्षण कायदा करून तो देशभर लागू करावा :एस.एम.देशमुख

**रायगड (प्रतिनिधी )**

देशातील पत्रकारांवरील हल्ल्याच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन केंद्र सरकारने पत्रकार संरक्षण कायदा तयार करून तो देशभर लागू करावा अशी मागणी एस.एम देशमुख यांनी केली आहे.खासदार सुनील तटकरे यांनी हा मुद्दा लोकसभेत उपस्थित करावा अशीही देशमुख यांनी त्यांना विनंती केली आहे..

रायगड प्रेस क्लबचा 20 वा वर्धापनदिन आणि पुरस्कार वितरण सोहळा आज खोपोली येथे साजरा करण्यात आला.. त्यावेळी एस.एम.देशमुख बोलत होते..

एस.एम. म्हणाले, छत्तीसगड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार सह देशाच्या विविध भागात पत्रकारांवर हल्ले वाढले आहेत, पत्रकाराच्या हत्या होत आहेत.. त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही त्यामुळे केंद्रानेच हा कायदा करावा अशी मागणी एस.एम यांनी केली आहे..




महाराष्ट्रातही पत्रकारांवरील हल्ल्याच्या घटना सातत्याने वाढत आहेत कारण महाराष्ट्र सरकारने पत्रकार संरक्षण कायदा तर केला मात्र त्याची अंमलबजावणी केली जात नाही.. राज्यात लवकर पत्रकार संरक्षण कायदयाची अंमलबजावणी करावी अशी मागणीही देशमुख यांनी केली..

यावेळी देशमुख यांनी रायगड प्रेस क्लबच्या कार्याचा गौरव केला..

खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात एस.एम.देशमुख यांनी केलेल्या मागणीचा उल्लेख करून हा विषय आपण लोकसभेत उपस्थित करून पत्रकार संरक्षण कायदा देशभर लागू होईल यादृष्टीने नक्की प्रयत्न करू असे आश्वासन दिले .. रायगड प्रेस क्लब करीत असलेल्या कार्याचा सुनील तटकरे यांनी गौरव केला..

प्रारंभी सुनील तटकरे यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.. दैनिक सागरच्या संपादिका शुभदा तथा नानी जोशी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले..मुंबई मराठी पत्रकार संघाच्या स्वाती घोसाळकर यांनी सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अन्य पत्रकारांचाही. यावेळी सन्मान करण्यात आला.

# फिटनेस नसलेल्या खाजगी काळी-पिवळी गाड्या चालतात रस्त्यावर !

**साकोली (प्रतिनिधी )**

साकोली तालुक्यामध्ये प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळी-पिवळ्या खाजगी गाड्या मोठया प्रमाणात चालत असतात.त्या काळी-पिवळ्या खाजगी गाड्यांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केली जाते.तर विशेष म्हणजे काही खाजगी गाड्या बऱ्याच वर्षापासून जुन्या असून,काही गाड्यांची फिटनेस सुद्धा संपलेली आहे. त्यामुळे एखादा होणारा मोठा अपघात कधी होईल हे न-सांगण्यासारखे आहे.तरी खाजगी वाहन चालक व मालकांकडून प्रवाशांच्या जीवांशी राजरोसपणे खेळत सुरु असताना,ह्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी गाड्या रस्त्यावर चालतात कशा? यांना अभय कोणाचे आहे? वाहतूक पोलीस ह्याकडे जाणीवपूर्वक




दुर्लक्ष करतात की काय?किंवा वाहतूक पोलीस खाजगी वाहन चालकांकडून हफ्ते तर घेत नाही? अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहेत.

साकोली तालुक्यामध्ये या काळी-पिवळी खाजगी गाडीचा या अगोदर एका नदीच्या पूलावर खूप मोठा अपघात झालेला होता.ज्यामध्ये काही महिला-मुली मृत्यूमुखी पडलेल्या होत्या. त्यावेळी काळी-पिवळी ही पूर्णपणे झालेली होती.गाडीला लाईट्स वगैरे नव्हते.तर गाडीची फिटनेस सुद्धा संपलेली होती.त्यावेळी घडलेल्या अपघातामुळे काही दिवस काळी-पिवळी खाजगी गाडी बंद करण्यात आलेल्या होत्या.

मात्र आता पुन्हा काळी-पिवळी खाजगी गाड्यांचा धुमाकूळ आपल्याला साकोली तालुक्यात बघायला मिळत आहे.खाजगी वाहन चालकांकडून गाडीवर अधिकचे प्रवासी बसवले जातात. तर प्रवासी हातातून सुटू नये, पुढचा प्रवासी हा आपल्या गाडीत बसावा.जेणेकरून आपल्याला पैसे मिळतील,यासाठी गाडी मोठ्या वेगाने चालवली जाते. मात्र खाजगी वाहन चालकांकडून पैशाच्या लालचीपोटी प्रवासी वर्गांच्या जीव धोक्यात आला आहे. काळी-पिवळी खाजगी गाडीची फिटनेस संपलेली असताना तसेच गाडीचे कागदपत्रे नसताना ह्या गाड्या रस्त्यावर चालतात कशा?यावर आशीर्वाद पोलिसांचे तर नाही ना? संबंधित अधिकाऱ्यांना एखादा मोठा अपघात होण्याची तर वाट नाही ना?असा मोठा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, दि. 16 फेब्रुवारी 2025

LAST PAGE

या जागेवर जाहिरात स्विकारली जाईल जाहिरातीसाठी संपर्क करा मो. 8446447777

## सद्रक्षणाय खलनिग्रहणाय आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ आला सर्वसामान्यांच्या मदतीला

# परळी पोलिसांच्या प्रयत्नातून मिसिंग झालेला व्यक्ती पोहोचला घरी!

**परळी वैद्यनाथ- प्रतिनिधी**

प्रयत्न एक युवक काही दिवसापासून मिसिंग असल्याची तक्रार पोलिसांना मिळाली आणि तपासाची चक्री फिरवली असता विविध माध्यमातून दिसून झालेल्या व्यक्तीचा शोध घेण्यास सुरुवात झाली आणि अथक प्रयत्नानंतर मिसिंग झालेल्या व्यक्तीची माहिती मिळाली.

परी पोलिसांनी आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजेच पत्रकार यांच्या सर्वांच्या मदतीने विविध माध्यमातून बातम्या प्रकाशित करून मिसिंग झालेल्या व्यक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि हा शोध यशस्वी ठरला. सविस्तर वृत्त असे की,






**मिसिंग झालेल्या व्यक्तीने सांगितली सर्व आपबीती!**

पोलीस ठाणे परळी शहर मिसिंग न.01/2025 मधील इसम नामे रणधीर सिंह शेषनारायण सिंह ठाकूर राहणार पेठ गल्ली परळी वैजनाथ हा दिनांक 30/01/2025 रोजी मित्राकडे जाऊन येतो असे म्हणून घरातून निघून गेल्याबाबत त्यांची पत्नी पायल रणधीर सिंह ठाकुर यांनी दिनांक 31/01/2025 रोजी तक्रार दिल्याने पोस्टे परळी शहर येथे मिसिंग दाखल केली होती. सदर मिसिंगचा तपास माननीय पोलीस निरीक्षक नाचन साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तपास करून शोध घेतला असता दिनांक 12/02/2025 रोजी मिळून आल्याने त्यास पोलीस ठाणे परळी शहर येथे घेऊन येऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता सांगितली सर्व आपबीती, सांगितले की मी थर्मल येथे लेबर चे काम करत होतो मला मंथली 7,000/- रुपये पगार असल्याने मला तेवढ्या पैशात माझ्या घरच्यांचा उदरनिर्वाह भागत नसल्याने मला पैशाची अडचणी येत होती म्हणून मी काम करण्यासाठी घरच्यांना काही न सांगता पुणे येथे गेलो होतो त्यानंतर माझी पत्नी पायल रणधीर सिंह ठाकुर हिने पोलीस ठाणे परळी शहर येथे मी मिसिंग झाल्याबाबत माहिती दिल्याची समजले.

तसेच पोलीस तपासी अंमलदार यांनी मी मिसिंग झाल्याबाबत पेपरमध्ये माहिती दिल्याचेही समजले त्यानंतर , मी दिनांक 12/01/2025 रोजी पहाटे चार वाजता घरी आलो त्यानंतर माझ्या घरच्यांनी पोलीस ठाणे परळी शहर येथील मिसिंग तपासी अंमलदार 2082 कोलमवाडी यांना मी आलेबाबत माहिती दिल्याने सदरचे इसमास पोलीस ठाणे येथे बोलावून त्याचा जबाब घेऊन त्याची पत्नी पायल हिच्याकडून ताबा पावती लिहून घेऊ त्यांच्या ताब्यात दिले.

खर म्हटलं तर एखादा हरवलेला व्यक्ती त्याच्या कुटुंबास परत मिळणे हे खूप भाग्यच असत आणि परळी पोलिसांनी हेच आपले कर्तव्य बजावला आहे.

# गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांकरीता अतिरिक्त घरभाडे भत्याची टॅब सुरु करण्याचे शिक्षण संचालकांचे आदेश

**गोंदिया.( सुधीर शिवणकर )**

संपूर्ण गोंदिया जिल्हा आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा आहे. आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी व अतिरिक्त घरभाडे भत्ता शासनाने लागू केलेला आहे.गोंदिया जिल्ह्यातील इतर सर्व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त घरभाडे वेतन प्रणाली मध्ये सुरू आहे.परंतु मार्च 2023 पासून शालार्थ वेतन प्रणाली मधून गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांकरीता टॅब बंद करण्यात आली होती. गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांवरील या अन्यायाविरुध्द महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने लढा दिला.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा गोंदियाच्या प्रयत्नामुळे लवकरच शालार्थ वेतन प्रणाली मध्ये अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब सुरू होणार आहे.गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांकरिता अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब शालार्थ वेतन प्रणाली मध्ये सुरू करण्यासंबंधी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा गोंदियाच्या वतीने गोंदिया जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम व प्राथमिक शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांच्याशी चर्चा केली होती. या चर्चेचे फलित म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक संचालनालय पुणे यांना दिनांक 17 ऑगस्ट 2024 ला पत्र लिहून टॅब सुरू करण्यासंदर्भात कळविले होते.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण संघ जिल्हा गोंदियाने गोंदिया जिल्ह्यातील आमदार राजकुमार बडोले आमदार विजयभाऊ रहांगडाले आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांच्याशी चर्चा करून अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब सुरू करण्यासंबंधी चर्चा केली. यामुळे सर्व आमदार महोदयांनी शिक्षण संचालक पुणे यांना पत्र लिहून गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांकरिता अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब सुरू करण्यासाठी कळविले होते.गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांकरिता अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब सुरू झालीच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ गोंदियाचे जिल्हाध्यक्ष किशोर बावनकर व उपाध्यक्ष शंकर चौहान यांनी शिक्षण उपसंचालक देविदास कुल्हाड यांच्याशी सातारा येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या महामंडळ सभेदरम्यान चर्चा केली. जिल्हाध्यक्ष किशोर बावनकर यांनी शिक्षण उपसंचालक शरद गोसावी यांच्याशी फोनवर चर्चा करून गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांच्या बंद झालेल्या अतिरिक्त घरभाडे भत्त्याच्या टॅब संबंधी चर्चा करून टॅब सुरू करण्यासंबंधी विनंती केली.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर बावनकर यांच्या नेतृत्वाखाली ग्राहक सोसायटीचे उपाध्यक्ष शंकर चव्हाण शाखाध्यक्ष कैलाश हांडगे जिल्हा प्रतिनिधी गजानन रामटेके सरचिटणीस सुरेश अमले उपाध्यक्ष सत्यवान गजभिये रमेश बिसेन मनोज नेवारे यांनी शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे कार्यालयात शिक्षण उपसंचालक रमाकांत काटमोरे यांच्याशी भेट घेवून चर्चा केली.यामुळे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा गोंदियाच्या प्रयत्नाला यश आले.अतिरिक्त घरभाडे भत्त्याची टॅब सुरू करण्यासाठीची बहुप्रतीक्षित मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन पूर्ण केल्याचे जिल्हाध्यक्ष किशोर बावनकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा गोंदियाच्या वतीने आमदार विनोदभाऊ अग्रवाल आमदार विजयभाऊ रहांगडाले आमदार राजकुमारजी बडोले जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामभाऊ भेंडारकर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकजभाऊ रहांगडाले मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांचे गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण शिक्षकांच्या वतीने आभार मानले आहे.

यासाठी विरेंद्र कटरे नूतन बांगरे उमाशंकर पारधी अयुब खान केदारनाथ गोटेफोडे अरविंद उके हेमंत पटले शंकर चौहान अनिरुद्ध मेश्राम सोमेश्वर मेश्राम मोरेश्वर बडवाईक राजेंद्र निंबार्ते लिकेश हिरापुरे गणेश चुटे वाय. डी.पटले सचिन राठोड सुनील सोनवणे लिकेश हिरापुरे प्रभाकर मेश्राम आर सी बिसेन राजेश रामटेके कैलाश हांडगे विनोद चौधरी महेंद्र चौहान सुरेश वाघाडे कृष्णा गभने शितल कनपटे सुरेश अमले चंदू दुर्गे राहुल कोणतमवार विजय डोये आर जी गोन्नाडे रमेश बिसेन मनोज नेवारे गजानन रामटेके अरविंद नाकाडे किशोर लंजे प्रशांत चव्हाण भुवन औरासे संदीप नंदेश्वर राजेंद्र बन्सोड कोमल नेवारे ओमेश्वरी बिसेन ओ.एस.बिसेन चंद्रशेखर दमाहे, माणिक घाटघुमर, तेजकुमार बिसेन, मनिष बलभद्रे, विजय लिल्हारे, मनिष राठोड, हर्ष पवार, सचिन वडीचार, ओमप्रकाश पटले, नंदू चित्रीव, देव जतपेले, सचिन धोपेकर, डी.सी. रहांगडाले,शंकर नागपुरे सुरेश मेश्राम जीतू गणवीर गौरीशंकर खराबे संतोष कवरे दिलीप शिवणकर डि बी लांजेवार एन आर लांजेवार चेतन उईके माधुरी मेश्राम प्रियंका रामटेके जितू कोहाडकर शंकर पौनिकर भारत सोनटक्के कृष्णा कुंभरे धनराज धानगाये टीकाराम मातवारे मोरेष सुर्यवंशी जीवन आकरे के.एस. रहांगडाले नरेंद्र आगाशे राजू गुन्नेवार विजय पारधी यांनी विशेष सहकार्य केले.



# "मेरी पॉलिसी मेरे हाथ" या उपक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना पीक विमा पॉलिसीचे वाटप

**परळी/ प्रतिनिधी**

मेरी पॉलिसी मेरे हाथ"* या उपक्रमा अंतर्गत शेतकर्यांना पीक विमा पॉलिसी चे वाटप. प्रधानमंत्री फसल बीमा योजना रब्बी हंगाम 2024- 25 अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी बँकेमार्फत विमा पॉलिसी घेतलेले आहेत. अशा शेतकऱ्यांना भारतीय कृषी विमा कंपनी लि, (AIC ) मार्फत विमा पॉलिसी वाटपाचा उपक्रम परळी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू आहे. त्या अनुषंगाने आज टोकवाडी व धर्मापुरी येथील शेतकऱ्यांना पीक विमा पॉलिसी वाटप कृषी कार्यालय परळी येथे तालुका कृषी अधिकारी यांचे हस्ते पीक विमाधारक शेतकऱ्यांना पॉलिसीचे वितरण करण्यात आले,

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री रवी मुंडे सर, ऑफिस Ao श्री गव्हाणे सर, वाळले मॅडम कृषि स., बागल मॅडम कृषि स. AIC तालुका प्रतिनिधी गोविंद वनवे , गणेश मुंडे, प्रणित उजगरे व शेतकरी उपस्थित होते.

# मोकाट वाहनांची मस्ती काढा !

**परळीत कर्णकर्कश आवाज करणा-या वाहनासह इतर वाहनावर मोठी कारवाई**

**जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांचे संयुक्त पथक सतर्क**



**परळी वैद्यनाथ - प्रतिनिधी**

बीड जिल्हयाचे पोलीस अधिक्षक कावत यांच्या आदेशानुसार अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके , अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नाचन व पो.नि.सुभाष सानप, जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परळी शहरातील कर्णकर्कश सायलेंसर, फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनांवर धडक कारवाई मोहीम सुरू केल्याने वाहनचालकांत खळबळ माजली आहे.

परळी शहरातील धूम स्टाईल वाहने चालवणाऱ्या चा त्रास हा सर्वसामान्य होतो. अशा प्रकारामुळे अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत.

त्यानुसार अचानक बुधवार दि 12 फेब्रुवारी पासून जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राणी लक्ष्मीबाई टॉवर, उड्डाण पुलावर वाहतूक पोलिस पथकाने कारवाई सुरू करत कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर, फॅन्सी नंबर प्लेट, वाहन परवाना तपासणी चालू केली.

शहरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून पोलिसाने अडवणे व चौकशी करणे याची सवय नसल्याने वाहनचालक व पोलिसांत वादविवाद या कारवाई दरम्यान होत होते.

मात्र पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याने अनेक वाहनचालकांनी निमूटपणे दंड देत आपली सुटका करून घेतली. या विशेष कारवाई दरम्यान पोलिसांनी जवळपास 135 वाहनांवर कारवाई केली. यात 11 बुलेटचे सायलेन्सर काढणे,दादा,भाऊ,काका, किंग अश्या फॅन्सी नंबरप्ले लावल्याबद्दल वाहनांवर तर वाहन परवाना नसल्याबद्दल वाहनांवर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत वाहनचकांवर 82 हजारची दंडात्मक कारवाई करण्यात आली असून या कारवाईमुळे परळी शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सुसाट वाहनचकांना चाप बसण्यासाठी वारंवार अश्या कडक कारवाया करण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. या कारवाईत बीड वाहतूक पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, पोलीस उपनिरीक्षक अमोल शिंगणे, हवालदार नारायण दराडे, पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत राठोड, नितीन काकडे,कल्याण जावळे,वसीम शेख,नारायण वाघमारे आदींचा सहभागी होते. पोलिसांनी केलेल्या या वाहनावरील कारवाईमुळे नागरिकात समाधान व्यक्त केले जात आहे

# अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय निवडणुकीमध्ये प्रा. डॉ.देवेंद्र कुलकर्णी लातूर यांचा विजय

**लातूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील आघाडीचे संगीत तज्ञ, संस्कार भारतीचे देवगिरी प्रांत उपाध्यक्ष दयानंद कला महाविद्यालय येथील संगीत विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ .देवेंद्र कुलकर्णी हे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ वाशी. ( नवी मुंबई )यांच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सर्वाधिक मतांनी विजयी झाले असून संगीत प्रेमींनी त्यांना भरभरून मते देऊन गांधर्व मंडळासाठी एक सुयोग्य उमेदवार देऊन पुन्हा एकदा विजयश्री ची माळ त्यांच्या गळ्यात घातली आहे. गांधर्व मंडळ हे संपूर्ण भारत आणि भारताबाहेर देखील संगीत कलाप्रेमीसाठी कार्य करणारी संस्था आहे, त्यांच्या सोबत त्याच पॅनल मधून सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आले असून हा खूप मोठा विजय आहे, त्यांच्या सोबत मराठवाड्यातील श्री बाळासाहेब सूर्यवंशी (गंगाखेड), श्री जनार्दन गुडे (पानगाव), तसेच महाराष्ट्र व इतर राज्यातील उमेदवार निवडून आले आहेत त्यात श्री सुनील हुकिरे (बार्शी), श्री सुधाकर चव्हाण (पुणे), श्री अरुण बोडे (नागपूर), क्षमा गोडसे (पुणे),ज्योती पांचाळ (पनवेल),श्री रामराव नायक (गोवा), निपा ठक्कर (गुजरात), मिलिंद शुक्ल (उजैन), श्री गणेश बरेठ (छत्तीसगढ), श्री जमिनिकांत मिश्र (ओरिसा).



# ग्रामपंचायतचा विरोध झुगारून स्टोन क्रेशरला परवानगी कायमस्वरूपी बंद करा; सरपंचाचे आमरण उपोषण सुरु

**लातूर | प्रतिनिधी**

शेतकऱ्यासह सर्वसामान्य नागरिकांना त्रासदायक ठरणारे पूजा स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी असताना तात्पुरती परवानगी देऊन क्रेशर चालू ठेवले. सदरील स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्यात यावे या मागणीसाठी रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथील सरपंच ओम चव्हाण यांनी गेल्या ११ फेब्रुवारी २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा शुक्रवार चौथा दिवस आहे.




रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी गावालगत पूजा स्टोन प्रेशर गेली पाच - सात वर्षापासून सुरू असून या क्रेशरमुळे परिसरातील शेतकऱ्यासह यशवंतवाडीच्या नागरिकांना त्रासदायक ठरत असल्याने यशवंतवाडीच्या ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा ठराव घेऊन सदरील क्रशर कायमस्वरूपी बंद करून स्थलांतरित करावे अशी मागणी केली असता रेणापूर तहसीलच्या मंडल अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करून वरिष्ठांना सविस्तर अहवाल सादर दिला आहे. दरम्यान क्रशर बंद करण्यात आले होते मात्र पुन्हा तात्पुरती परवानगी दिल्याने क्रशर आज मितीस सुरूच आहे.

या क्रशर मधून मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या धुळीचा त्रास होत असून या धुळीमुळे परिसरातील शेती पिकाच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. स्टोन क्रेशरच्या ब्लास्टिंगमुळे यशवंतवाडी गावातील अनेक कच्च्या घरांना लहान मोठ्या भेगा पडल्या, शौचालयाच्या टाक्या शोषखड्डे ब्लॉक होत आहेत. सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीला तडे गेले त्यामुळे पाण्याच्या टाकीची गळती सुरू झाली. ब्लास्टिंगच्या आवाजाने वन्यप्राणी भयभयीत होऊन शेती पिकाची नासधुस करीत आहेत. सार्वजनिक विहिरीतील पाणी उन्हाळ्यात वाटत असल्याने दरवर्षी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. बालक, वृद्धासह गरोदर मातांना ब्लास्टिंगच्या आवाजाचा त्रास होत आहे.

पूजा स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी असताना शासनाने तात्पुरती परवानगी देऊन स्टोन क्रशर चालू ठेवल्याने ग्रामस्थातून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. सदरील स्टोन क्रशर तात्काळ बंद करण्यात यावे आणि नागरिकांना दिलासा द्यावा या मागणीसाठी यशवंतवाडीचे सरपंच ओम शंकरराव चव्हाण यांनी गेल्या ११ फेब्रुवारी २०२५ पासून लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सरपंच चव्हाण यांच्या उपोषणाचा आजचा चौथा दिवस असून दररोज ग्रामस्थांबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील सरपंच व इतर लोकप्रतिनिधी उपोषण स्थळाला भेटी देऊन समर्थन देत आहेत.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)